महाराष्ट्र शासन
स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
कोकण भवन,सहावा मजला,नवी मुंबई ४०० ६१४
☎ 🖷:- -022,27571391. E.Mail:- calfak6@yahoo.com

## कार्यालयीन आदेश क्रमांक ४ दिनांक 4 JAN 2010

विषय:- मुख्य लेखापरीक्षक यांचे कार्यालयीन आदेश क्रमांक ९० अन्वये निकाली काढलेल्या घटकांचा एकत्रित संयुक्त परिच्छेद पंचायत राज समिती पुनर्विलोकन अहवालात दरवर्षी घेणेबाबत.

मुख्य लेखापरीक्षक यांचे कार्यालयीन आदेश क्रमांक ९० अन्वये निकाली काढलेले वर्षनिहाय घटक ग्रामपंचायतीकडून लेखापरीक्षणास लेखे उपलब्ध होत नसल्यास मुख्य लेखापरीक्षक यांचे कार्यालयीन आदेश क्रमांक ९० दिनांक २८/७/२००६ अन्वये देण्यात आलेल्या सूचनांनुसार कार्यवाही करावयाची आहे. प्रस्तुत कार्यवाहीनंतर अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या कालावधीचे लेखापरीक्षण होण्याची इच्छा प्रदर्शित केल्यास त्यावर विभागीय सहमुख्य लेखापरीक्षक यांनी त्यांचे स्तरावरून कार्यवाही करावी.

मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांचे आदेश क्रमांक ९० अन्वये प्रलंबित असलेले ग्रामपंचायतीचे लेखापरीक्षणाबाबतचे परिच्छेद एकत्रित करून संयुक्त परिच्छेद पंचायत समिती पुर्नविलोकन अहवालामध्ये दरवर्षी घेण्यासाठी विभागीय सहमुख्य लेखापरीक्षक यांनी मुख्य लेखापरीक्षक कार्यालयास प्रस्तावीत करावे. तसेच कार्यालयीन आदेश क्रमांक ९० दिनांक २८/७/२००६ मध्ये कार्यालयीन आदेश क्रमांक ३८ दिनांक ३०/७/२००९ अन्वये आवश्यक त्या दुरूस्त्या करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार सर्व विभागीय सहमुख्य लेखापरीक्षक यांनी कार्यवाही करावी.

(माणिक कौरथी)
मुख्य लेखापरीक्षक,
स्थानिक निधी लेखा,
महाराष्ट्र राज्य

प्रत:-

१. सहमुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा,
मुंबई / नाशिक / पुणे / औरंगाबाद / अमरावती / नागपूर
२. उपमुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा,
जिल्हा -----------------.

वि com hcl ASA letter १११०